आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२ जुलै २०२६ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भारत जपान १६व्या शिखर परिषदेअंतर्गत दोन्ही देशांच्या प्रधानमंत्र्यांची चर्चा

- केंद्रीय कृषीमंत्र्यांच्या हस्ते विकसित भारत जीरामजी योजनेचं औपचारिक उद्घाटन

- मराठी भाषा भवनाचं काम वेगाने सुरू असून डिसेंबर २०२७पर्यंत ते पूर्ण होईल, असं मराठी भाषा मंत्र्यांचं विधानसभेत आश्वासन

**आणि**

- अमरनाथ यात्रेकरुंचा पहिला जत्था जम्मू इथून कडक सुरक्षा व्यवस्थेत रवाना

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत जपानच्या प्रधानमंत्री साने ताकाइची यांच्याबरोबर वार्षिक शिखर परिषदे मधे  चर्चा करतील. जपानच्या प्रधानमंत्री ताकाइची यांचं तीन दिवसांच्या भारत दौऱ्यासाठी काल संध्याकाळी नवी दिल्लीत आगमन झालं. राष्ट्रपती भवनाच्या प्रांगणात आज त्यांना पारंपरिक लष्करी मानवंदना देण्यात आली. मोदी त्यावेळी उपस्थित होते. जपानी प्रधानमंत्री १६व्या भारत जपान शिखर परिषदेत भाग घेण्यासाठी आल्या आहेत. त्यांच्या या भेटीदरम्यान दोन्ही देशांमधे विविध बाबींसंदर्भात अनेक सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात येईल.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ताकाइची यांचं स्वागत करताना, भारत आणि जपान इंडो-पॅसिफिक तसंच जागतिक स्तरावर शांतता, स्थिरता आणि समृद्धीसाठी संयुक्तपणे कार्य करत राहतील, असा विश्वास व्यक्त केला.

**<><><><><>**

केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते आज आंध्र प्रदेशाच्या तिरुपती जिल्ह्यात विकसित भारत जी राम जी योजनेचं औपचारिक उद्घाटन झालं. मुख्यमंत्री एन चंद्राबाबू नायडू आणि उपमुख्यमंत्री पवन  कल्याण हे ही यावेळी उपस्थित होते. यावेळी लाभार्थींना जी राम जी कार्डांचं वाटप करण्यात आलं. तसंच जी राम जी पोर्टलचं उदघाटनही झालं.

जुन्या मनरेगा कायद्याची जागा घेणारा हा कायदा कालपासून देशात लागू झाला आहे. मनरेगा आणि व्हीबीजीरीमजी योजनेतला फरक सांगताना कृषीमंत्री चौहान यांनी सांगितलं.

- **- - - होल्ड - बाईट- शिवराजसिंग चौहान- - - -**

**<><><><><>**

महाराष्ट्रात विकसित भारत जी राम जी योजना लागू झाल्यानंतर ती सुलभ पद्धतीने राबवण्यासाठी, त्याचप्रमाणे जुन्या योजनेतील काही बाबी यातही समाविष्ट करण्यात आल्या असून त्या कशा प्रकारे अमलात येतील हे समजावून सांगण्यासाठी राज्यस्तरावर आमदारांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात येईल. अशी माहिती प्रभारी मंत्री शंभूराज देसाई यांनी आज विधानसभेत दिली.

अकोला पश्चिमचे काँग्रेस आमदार साजिद खान पठाण यांना काल फोनवर बिश्नोई टोळीने जीवे मारण्याची धमकी दिली. विरोधी पक्षांनी हा मुद्दा विधान सभेत उपस्थित केला आणि राज्यातल्या कायदा सुव्यवस्थेवर चिंता व्यक्त केली. संबंधित सदस्यांच्या संरक्षणाचा आढावा घेण्याचं काम सुरू असून याप्रकरणी पोलीस आयुक्त गरजेनुसार संरक्षण पुरवतील असं आश्वासन प्रभारी मंत्री शंभूराज देसाई यांनी दिलं. यानंतर शेतकरी आत्महत्येच्या मुद्द्यावरचा स्थगन प्रस्ताव नाकारल्याबद्दल विरोधी पक्षसदस्यांनी नाराजी व्यक्त करून सभात्याग केला.

**<><><><><>**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर मराठी भाषा भवनाचं काम वेगाने सुरू असून डिसेंबर २०२७पर्यंत त्याचं काम पूर्ण होईल, तसंच ऐरोलीत भाषा उपकेंद्राचं कामही प्रगतीपथावर आहे, अशी ग्वाही मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी दिली. विधानपरिषदेत अर्धा तास चर्चेवेळी ते बोलत होते. बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या नावाने नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, पुणे, कोल्हापूर आणि रत्नागिरी या पहिल्या ८ ठिकाणी मराठी भाषा विकास केंद्रं स्थापन करायचा निर्णय सरकारने घेतला असून एका वर्षात त्याची अंमलबजावणी होईल, अशी माहिती त्यांनी दिली. यासाठी जिल्हा भाषा अधिकारी नेमायचा निर्णय घेतला असून एका महिन्यात त्याची अंमलबजावणी होईल, असं सामंत म्हणाले. विविध साहित्यिकांच्या उत्तम साहित्याचा मराठीत अनुवाद करण्यासाठी माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी स्थापन केलेल्या समितीचं

पुनरुज्जीवन करण्याचा निर्णय सरकारने घेतल्याचं ते म्हणाले. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर केंद्राकडून निधी मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत, असं त्यांनी नमूद केलं. लंडनमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने आंतरराष्ट्रीय वैश्विक मराठी केंद्राची कारवाई २ वर्षांत पूर्ण होईल, असं आश्वासन त्यांनी दिलं. ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, निवृत्तीनाथ, निळोबाराय यांचं साहित्य घरोघरी पोचण्यासाठी विभागाने पुढाकार घेऊन अनुदान मंजूर केल्याचा उल्लेखही सामंत यांनी केला.

<><><><>

शेती आणि गैरव्यवसायिक कामासाठी गौण खनिजाचा वापर करण्यासाठी स्वामित्व शुल्क माफ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या गौण खनिजाचा वापर शेती, शेतघर, शेत रस्ता दुरुस्ती, गोठा वगैरे गैरव्यवसायिक कामासाठी करता येईल अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. यासाठी शेतकऱ्यांना मंडळ अधिकाऱ्यांकडे अर्ज करावा लागेल आणि १५ दिवसात त्यांना मंजुरी मिळेल, असं बावनकुळे यांनी सांगितलं.

<><><><>

अमरनाथ यात्रेसाठी भाविकांच्या पहिल्या जत्थ्याला जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी आज सकाळी जम्मू इथल्या भगवती नगर बेस कॅम्पवरून हिरवा झेंडा दाखवला. यावेळी खासदार जुगल किशोर शर्मा यांनी भाविकांना सुरक्षित यात्रेसाठी शुभेच्छा दिल्या. ५७ दिवस चालणारी ही वार्षिक यात्रा २८ ऑगस्ट पर्यंत सुरू राहील. कडक सुरक्षा व्यवस्थेत भाविकांचा पहिला जथा आज पहाटे जम्मू इथून रवाना करण्यात आला. काश्मीर खोऱ्यातल्या बालताल आणि पहलगाम या दोन्ही मार्गांवरुन ठिकाणी यात्रेकरुंच्या सुरक्षेसाठी बहुस्तरीय सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली असून, उच्च तंत्रज्ञान आधारित सीसीटीव्ही कॅमेरे आणि आरएफआयडी ट्रॅकिंगची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

<><><><>

दहशतवादाचं कोणत्याही परिस्थितीत समर्थन केलं जाऊ शकत नाही आणि ही समस्या मुळापासून नष्ट व्हायला हवी, या आपल्या ठाम भूमिकेचा भारताने पुनरुच्चार केला आहे. संयुक्त राष्ट्रांच्या दहशतवादविरोधी धोरणाच्या नवव्या आढावा बैठकीत संयुक्त राष्ट्रांमधले भारताचे स्थायी प्रतिनिधी, हरिश पर्वतनेनी म्हणाले की, भारताने अनेक दशकांपासून सीमापार दहशतवादाचा सामना केला आहे. म्हणूनच दहशतवादाच्या सर्व स्वरुपांचा निषेध

करण्यावर भारत ठाम आहे. दहशतवादाविरोधी लढ्यात सदस्य राष्ट्रांनी एकत्रितपणे आणि सक्रिय सहभागी होण्याचं आवाहन पर्वतनेनी यांनी यावेळी केलं. प्रभावी जागतिक सहकार्यासाठी एक सार्वत्रिक कायदेशीर चौकट आवश्यक असल्याचं सांगत, त्यांनी आंतरराष्ट्रीय दहशतवादावरच्या सर्वसमावेशक कराराचा लवकरात लवकर अवलंब करण्याच्या भारताच्या आवाहनाचा पुनरुच्चार केला.

<><><><>

युक्रेनची राजधानी कीव्ह इथं रशियाच्या ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यात १३ जण मरण पावले, तर अनेक जण जखमी झाले. काल रात्रभर कीव्हमधून स्फोटांचे आवाज येत होते, असं स्थानिक वृत्तसंस्थेनं सांगितलं. गेल्या आठवड्यात युक्रेनने मॉस्कोवर हल्ला केल्यानंतर प्रत्युत्तरात काल रशियानं कीव्ह वर हल्ले केले.

<><><><>

उत्तर प्रदेशात बरेली इथल्या रेल्वे यार्डात महत्वाच्या दुरुस्ती कामासाठी ३० दिवसांचा मेगा ब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यामुळे मुंबईकडे येणारी बरेली लोकमान्य टिळक टर्मिनस एक्सप्रेस गाडी ११ जुलै ते ३ऑगस्ट या काळासाठी  रद्द करण्यात आली आहे.

<><><><>

फिफा फुटबॉल विश्वकप स्पर्धेत काल बेल्जियमने सेनेगल ला ३-२ ने हरवून जोरदार पुनरागमन करत प्रमुख १६ संघांमध्ये स्थान पटकावलं आहे. दुसऱ्या एका सामन्यात इंग्लंडनं काँगो ला २-१ ने हरवलं. अंतिम १६ संघात स्थान मिळवण्यासाठी आता येत्या ६ जुलै ला इंग्लंड चा सामना मेक्सिको शी होणार आहे.

<><><><>

भारत आणि इंग्लंड क्रिकेट संघांदरम्यान काल इंग्लडच्या चेस्टर-ले-स्ट्रीट इथं नियोजित असलेला २० षटकांचा सामना पावसामुळे रद्द करण्यात आला. यामुळे पाच सामन्यांची ही मालिका सध्या ०-० अशी बरोबरीत आहे.

<><><><>

देशाच्या विविध भागात जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. येत्या दोन दिवसांत कर्नाटक, गुजरात, कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रात मुसळधार ते अति मुसळधार पावसाची शक्यता आहे. छत्तीसगड, हिमाचल प्रदेशसह विविध राज्य आणि

विदर्भातही पुढील तीन दिवस मुसळधार ते अति मुसळधार पावसाची स्थिती राहण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**